# मेट्रो भुयारीकरणाचा दुसरा टप्पा पूर्ण

म. टा. प्रतिनिधी, मुंबई





कुलाबा ते सीप्झ मेट्रो ३ च्या सातव्या पॅकेजमधील सीप्झ स्थानकावर बुधवारी भुयारीकरणाचा दुसरा टप्पा पूर्ण करण्यात आला. वैनगंगा-२ या टनेल बोअरिंग मशीनने २३ ऑगस्ट २०१७ रोजी सारीपुत नगर शाफ्ट येथून आपले काम सुरू केले होते. या मशिनने ५६८ मीटचे भुयारीकरण अवघ्या १२५ दिवसात आणि २५०हून अधिक इंजिनीअर व कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमाने पूर्ण झाले.

वैनगंगा-२ या टीबीएमची रचना भूगर्भातील कठीण खडक असलेल्या बेसाल्ट, टफ यांना भेदून भुयारीकरणासाठी केली आहे. ९२ मीटर मीटर लांबीचे वैनगंगा मशिन प्रतिदिन १० ते १३ मीटर भुयार तयार करते. हे भुयार एकूण ४०५ आरसीसी सिमेंटने तयार केलेले आहे. मेट्रोने आतापर्यंत १५ किलोमीटर इतके भुयारीकरण पूर्ण केले असून यासाठी एकूण १० टीबीएम शाफ्टमधून तब्बल १७ टीबीएम मशीन कार्यरत आहेत.

एल अँड टी आणि शांघाय टनेल इंजिनीअरिंगच्या या मशिनमार्फत एमआयडीसीमार्गे मरोळ नाका ते सीप्झ या स्थानकांमधील भुयारीकरणाचे काम करते आहे. त्याची लांबी ७.७ किमी असून या भुयारीकरणातून एकूण ११ लाख क्यूबिक मीटर इतकी माती उत्खनन होणार आहे. ही माती तळवाई-पिसे येथे राज्य सरकारने दिलेल्या जागेवर टाकली जाईल. आतापर्यंत एकूण ४.२ क्यूबिक मीटर इतकी माती बाहेर काढण्यात आली आहे.

एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी मुंबई मेट्रो ३च्या भुयारीकरणाचा दुसरा टप्पा .यशस्वीपणे पार करून केल्याबद्दल सर्व इंजिनीअर व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे. या प्रकल्पामध्ये कार्यरत असलेले प्रत्येकाच्या अथक परिश्रमामुळे भुयाराचा दुसरा टप्पा पूर्ण करण्यास यश मिळाले असल्याचे भिडे यांनी सांगितले.

## हे तीन भाग जोडणार

मेट्रो ३ मुळे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, आरे कॉलनी, वर्सोवा-अंधेरी- घाटकोपर मेट्रो १ मार्गिका, आणि स्वामी समर्थ नगर- जोगेश्वरी- कांजुरमार्ग- विक्रोळी मेट्रो ६ मार्गिका व सीप्झ, एमआयडीसी सारख्या व्यावसायिक क्षेत्राला जोडली जाणार आहे.